## जनसंपर्क विभाग

जळगाव दि. १६ (प्रतिनिधी) : अनुशोधन राष्ट्रीय संशोधन प्रतिष्ठान (ANRF) अंतर्गत अ मल्टीयुनिर्व्हसिटी अलायन्स ऑन हेल्थ ॲण्ड एनर्जी थ्रू इंजिनिअर्ड बायोमोलक्युलर सिस्टीम्स (A Multiversity Alliance on Health and Energy Through Engineered Biomolecular Systems) या प्रकल्पासाठी दोन कोटी तीस लाख रुपयांची निधी मंजूर करण्यात आले आहे. हा प्रकल्प इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स एज्युकेशन अँड रिसर्च (IISER), पुणे येथील डॉ.होमी भाभा रोड येथील मुख्य संशोधन प्रा.होथा श्रीनिवास यांच्या नेतृत्वाखाली चालविण्यात येणार आहे. विद्यापीठाचे कुलगुरु प्रा. व्ही. एल. माहेश्वरी यांच्या नेतृत्वात विद्यापीठातील सामूहिक प्रयत्नामुळे राष्ट्रीय राज्यविद्यापीठ रँकिंग मधे 100 च्या आत आल्यामुळे कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ या प्रकल्पासाठी पात्र झाले आहे.

हा प्रकल्प अविष्कार आणि संशोधानातील गती वाढविण्यासाठी सहभागीदार (PAIR) योजनेअंतर्गत वर्ग - ब करीता विद्यापीठाचा समावेश करण्यात आला असून, एक वर्षासाठी हा निधी मंजूर करण्यात आला आहे. अनुदानाची रक्कम ही ग्रांट-इन-एड जनरल (Recurring head) अंतर्गत आहे. या प्रकल्पात पुढील सहा संस्था सहभागी आहेत: 1. इस्लामिक युनिर्व्हसिटी ऑफ सायन्स अँड टेक्नॉलॉजी, अवंतीपोरा- डॉ.आबिद हुसेन शाल्ला 2. मणिपूर युनिर्व्हसिटी, इंफाळ - डॉ. राजू लैशराम 3. मोहनलाल सुखाडिया युनिर्व्हसिटी उदयपूर - डॉ. सिध्दार्थ शर्मा 4. कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव. - प्रा. दिपक शरद दलाल 5. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे - प्रा.राजू गच्चे 6. काश्मीर युनिर्व्हसिटी, श्रीनगर - प्रा. अजीज ए. दार या विद्यापीठाचा सहभाग आहे.

या प्रकल्पामुळे संशोधन पायाभूत सुविधा, सहयोगी प्रकल्प आणि शैक्षणिक देवाणघेवाणीला पाठिंबा मिळणार आहे. त्यात चार कार्यशाळा, काही प्राध्यापक व संशोधक विद्यार्थ्यांना इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स एज्युकेशन अँड रिसर्च (IISER), पुणे येथे संशोधन कार्य करण्यासाठी निधी प्राप्त झाला आहे.

**बातमी नं. २**

जळगाव दि. १६ (प्रतिनिधी) : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात 'पेटंट मूल्यांकन आणि व्यवस्थापन' या पदविका अभ्यासक्रमाची सुरुवात करण्यात आली आहे.

विद्यापीठ अनुदान आयोगाचे सचिव प्रा. मनीष जोशी यांच्या उपस्थितीत अभ्यासक्रमाच्या माहितीपत्रकाचे औपचारिक अनावरण करण्यात आले. यावेळी मंचावर विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. व्ही एल माहेश्वरी, आग्रा येथील केंद्रीय हिंदी संस्थानचे निदेशक प्रा. डॉ. सुनील कुलकर्णी, प्र-कुलगुरू एस टी इंगळे, कुलसचिव डॉ. विनोद पाटील उपस्थित होते.

या अभ्यासक्रमामुळे विद्यापीठ परिक्षेत्रातील विद्यार्थ्यांना पेटंट एजन्ट किंवा पेटंट तपासनीस सारख्या पदांसाठी होणाऱ्या स्पर्धा परीक्षेच्या तयारीसाठी फायदा होणार आहे. तसेच अधिकाधिक प्रमाणात दर्जेदार पेटंट नोंदणी होण्यास देखील मदत होणार आहे. आतापर्यंत विद्यापीठाला मिळालेल्या एकूण बत्तीस पेटंट ची माहिती असलेल्या रिपोजिटोरी ऑफ आयपीआर (Repository of IPR at KBCNMU) या पुस्तिकेचे प्रकाशनही याप्रसंगी करण्यात आले. या पुस्तिकेमुळे विद्यापीठातच्या पेटंट झालेल्या पद्धती किंवा उत्पादनांना व्यावसायिक बाजारपेठ उपलब्ध होण्यास मदत होणार आहे.

या कार्यक्रमास कुलसचिव डॉ. विनोद पाटील, पीठासीन प्राध्यापक डॉ. डी. जी. हुंडीवाले, विविध विद्याशाखांचे अधिष्ठाता तसेच प्रशाळांचे संचालक उपस्थित होते. विद्यापीठात सुरु झालेल्या या नवीनतम आणि रोजगारक्षम अभ्यासक्रमासाठी कुठल्याही विद्याशाखेचा पदवीधर नोंदणी करू शकणार असल्याने जास्तीत जास्त संख्येने इच्छुकांनी लाभ घेण्याचे आवाहन विभागाचे समन्वयक प्रा. विकास गिते यांनी केले आहे.

**बातमी क्रमांक ३**

जळगाव दि. १६ (प्रतिनिधी) : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या संगणक शास्त्र प्रशाळेच्या विद्यार्थ्यांची सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा या क्विक हिल फाउंडेशनच्या उपक्रमासाठी क्लब ऑफिसर म्हणून निवड करण्यात आली.

विद्यापीठातील संगणक शास्त्र शाळेच्या उत्तम नेतृत्व गुण असलेल्या विद्यार्थ्यांपैकी क्लब ऑफिसर म्हणून निवड झालेल्या विद्यार्थ्यांचा पदग्रहण सोहळा नुकताच पुणे येथे संपन्न झाला. यात अध्यक्षपदी मयूर बंडे, सचिव नेहा पाटील, उपक्रम प्रमुख जानवी सपकाळे तर मीडिया प्रमुख म्हणून भावेश नाले यांची नियुक्ती करण्यात आली. या विद्यार्थ्यांच्या माध्यमातून सायबर गुन्हे विषयक जनजागृती परिसंवाद कार्यशाळा यासह विविध उपक्रम राबविले जाणार आहेत.

यावेळी क्विक हिलच्या अध्यक्ष अनुपमा काटकर यांच्या हस्ते क्विक हिल केबीसी एन एम यू सायबर वॉरियर क्लब ची स्थापना करण्यात आली. यावेळी क्विक हिल फाउंडेशनचे असोसिएट डायरेक्टर अजय शिर्के, सी एस आर एक्झिक्युटर गायत्री पवार - केसकर, दिपू सिंग, साक्षी लवंगारे यांनी मार्गदर्शन केले.

**बातमी क्रमांक 4**

जळगाव दि. १६ (प्रतिनिधी) : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या माध्यमशास्त्र प्रशाळेत डिप्लोमा इन जर्नालिझम, बी.ए (एम.सी.जे), एम.ए (एम.सी.जे) या अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रियेला सुरुवात झाली असून अंतिम मुदत दि. ३१ जुलै २०२५ पर्यंत आहे. या सोबत डिजिटल आणि सोशल मीडिया, कॅमेरा हॅन्डलिंग, व्हिडिओ एडिटींग, रेडिओ जॉकी, रायटींग फॉर न्यूजपेपर, न्यूजपेपर पेजिनेशन, जनसंपर्क या तीन महिन्यांच्या प्रमाणपत्र अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रियेला देखील सुरुवात झाली आहे. हे सर्व अभ्यासक्रम कौशल्य आधारित व रोजगारभिमुख आहेत.

॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)

## जनसंपर्क विभाग

प्रवेशाकरीता विद्यार्थ्यांनी विद्यापीठाच्या www.nmu.ac.in या संकेतस्थळावर भेट देवून https://nmuj.digitaluniversity.ac या ऑनलाईन ऍडमिशन लिंकला क्लिक करून प्रवेशासंबंधी अर्ज करणे आवश्यक आहे. तरी इच्छुक विद्यार्थ्यांनी प्रवेशासंबंधी अधिक माहितीसाठी माध्यमशास्त्र प्रशाळेचे संचालक प्रा.डॉ. सुधीर भटकर (8407922404), डॉ. गोपी सोरडे (9834166072) अथवा प्रशाळेत कार्यालयीन वेळेत 0257-2257436, 2257438 या क्रमांकावर संपर्क साधावा असे आवाहन माध्यमशास्त्र प्रशाळेचे संचालक प्रा.डॉ. सुधीर भटकर यांनी केले आहे.

.................................................................................................................................

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२५ दिनांक: १६ जुलै, २०२५

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

जनसंपर्क अधिकारी करीता

॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥
'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)
# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव
Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

## जनसंपर्क विभाग

जळगाव दि. १६ (प्रतिनिधी) : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ प्रशाळा व संलग्नित महाविद्यालयातील एम.एस्सी. (सर्व विषय) आणि एम.एस्सी. / एम.ए. (भूगोल) प्रथम वर्ष या पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या विविध विषयांसाठी केंद्रीय पध्दतीने ऑनलाईन नोंदणी प्रवेश प्रक्रिया सुरु झाली असून सदर विद्यार्थ्यांना अर्ज करण्याची तारीख २२ जून, २०२५ देण्यात आली होती. परंतू काही विद्यार्थ्यांचे निकाल अद्याप विद्यार्थ्यांना तांत्रिक अडचणींमुळे पोहचलेले नसल्याने आता विद्यार्थ्यांना अर्ज करण्याची तारीख ३१ जुलै, २०२५ पर्यंत वाढवून देण्यात येत आहे. याची कृपया सर्व विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी. असे विद्यापीठाच्यावतीने कळविण्यात येत आहे.

.......................................................................................................................................

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२५ दिनांक: १६ जुलै, २०२५

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

जनसंपर्क अधिकारी करीता